# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**2021**

# प्रेस नोट

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **मध्यवर्ती कक्ष** दिनांक /११/२०२१

---

**भरदिवसा अग्निशस्त्राचा धाक दाखवुन अंबिका ज्वेलर्सवर दरोडा टाकरणारे दरोडेखोर यांना मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबईकडुन ५ दारोडेखोरांना राजस्थान येथुन जेरबंद केले**

---

नवी मुंबईतील घणसोली, से.नं. ७, सिम्पलेक्स येथील अंबिका ज्वेलर्स शॉप नं. १७ ई, गुरूदेवदत्त सोसायटी याठिकाणी दिनांक १४/११/२०२१ रोजी दुपारी १३:१५ ते दुपारी १४:०० वा.सुमारास ३ दरोडेखोर व त्यांचे साथीदार यांनी दरोडयाचा कट रचुन शस्त्रासह दुकानात प्रवेश करून अग्निशस्त्राचा धाक दाखवुन गुन्हयातील फिर्यादी व दुकानातील कामगारास बाथरूममध्ये नेवुन त्यांचे तोंड चिकट पट्टीने बंद करून हात पाय बांधुन दुकानातील ३,३०३.५८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे-चांदीचे दागिने, रोख रक्कम व इतर वस्तु असे एकुण १,३९,२१,०७७/- रूपये किमंतीचे सोने-चांदीचे दागिने व रक्कम दरोडा टाकुन जबरी चोरी करून नेले बाबत रबाळे पोलीस ठाणे गु.रजि.नं.४७०/२०२१ भादवि सं.कलम ३९५, ३९७, ३९२, ३४२, २०१, १२०(ब) सह आर्म ॲक्ट कलम ३, २५ व म.पो.का.कलम ३७(१),१३५ अन्वये गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयातील आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई श्री. बिपीनकुमार सिंह, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. जय जाधव, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. महेश घुर्ये नवी मुंबई, श्री. सुरेश मेंगडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई व श्री. विनोद चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी आदेशीत केले.

सदर घटनेचे गांभीर्य पाहून अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नवी मुंबई यांचे आदेशान्वये पोलीस उप आयुक्त व सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली खालीलप्रामणे विशेष तपास पथक तयार केले.

१) पोलीस निरीक्षक, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई **(प्रमुख प्रभारी अधिकारी)**
२) पोलीस निरीक्षक, प्रशासन, गुन्हे शाखा, नवी मुंबई
३) पोलीस निरीक्षक, कक्ष-१, गुन्हे शाखा, नवी मुंबई
४) पोलीस निरीक्षक, सायबर सेल, गुन्हे शाखा, नवी मुंबई
५) पोलीस निरीक्षक, अर्थिक गुन्हे शाखा-१, गुन्हे शाखा, नवी मुंबई
६) पोलीस निरीक्षक, कक्ष-२ , गुन्हे शाखा, नवी मुंबई
७) पोलीस निरीक्षक, कक्ष-३, गुन्हे शाखा, नवी मुंबई

नमुद गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकिस आणण्याकरीता वर नमुद तपास पथकास आदेशित केले होते. त्यानुसार मध्यवर्ती कक्ष, गुन्हेशाखा नवी मुंबई यांचेकडुन गुन्हयातील आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकिस आणण्याकरीता समांतर तपास सुरु करण्यात आला होता. त्यानुसार तांत्रिक तपासादरम्यान मध्यवर्ती कक्षाकडील अधिकारी/अंमलदार यांना धागेदोरे मिळाले.

अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी तयार केलेल्या विशेष पथकाने तपासात केलेल्या मदतीवरुन विशेषत: अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे वाचक सपोनि, पोना आजिनाथ फुंदे व प्रकाश साळुंखे हे देत असलेल्या बॅकअपव्दारे तांत्रिक तपासाचे आधारे गुन्हयातील आरोपी हे राजसमंद जिल्हा, राजस्थान येथे असल्याबाबत खात्रीशीर माहिती दिल्याने वरिष्ठांचे आदेशान्वये मध्यवर्ती कक्षाकडील सपोनि तांबे, सपोनि भेदोडकर व अंमलदार यांचे पथक तयार करुन सतत सात दिवस राजस्थान राज्यात अहोरात्र मेहनत घेवुन गुन्हयातील खालील आरोपी (दरोडेखोर) यांना अतिशय शिताफिने अटक केली.

**१) प्रकाशचंद्र सोहनलाल गुर्जर, वय २४ वर्षे**
**२) मोतीलाल किशनलाल गुर्जर, वय ३२ वर्षे**
**३) कन्हैयालाल उर्फ कान्हा भिमराज जाट, वय २३ वर्षे**
**४) दिपक रुपजी गायरी, वय २३ वर्षे**
**५)शंकरलाल उर्फ संपत माधवलाल जाट, वय ३० वर्षे,**
सर्व राहणार राजसमंद जिल्हा, राजस्थान राज्य

- **वरील ५ आरोपींकडून गुन्हयात दरोडा टाकुन लुटलेला १९६५ ग्रॅम दागिने व २1 किलो ४५२ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिणे व चांदीच्या विटा असा माल हस्तगत करण्यात आला आहे.**

- सदरची उल्लेखनिय कामगीरी वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनाखली अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे आदेशान्वये विशेष तपास पथकाने व वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले, सपोनि निलेश तांबे, सपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि राजेश गज्जल, सपोनि जी.डी.देवडे पोलीस, सपोनि विजय चव्हाण, अंमलदार - सतिष सरफरे, अतिष कदम, मंगेश वाट, शशिकांत शेंडगे, नितीन जगताप , जगदीश तांडेल, उर्मीला बोराडे, विष्णु पवार, प्रकाश सांळुखे, सचिन टिके, आजिनाथ फुंदे, किरण राऊत, लक्ष्मण कोपरकर, महेश पाटील, मेघनाथ पाटील, सतिष चव्हाण, अजय कदम, राहुल वाघ, विजय खरटमोल, नंदकुमार ढगे, अभय मेऱ्या यांनी केलेली असुन गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसल मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई हे करीत आहेत.

******************